# प्रेसनोट

## वाहनचोरी विरोधी पथक, गुन्हेशाखा, पुणे शहर कडून मारुती कंपनीची स्विफ्ट कार चोरी करणा-या इसमास अटक.

दिनांक-१०/१०/२०१८ रोजी वाहनचोरी विरोधी पथक, गुन्हे शाखा, पुणे शहर कडील पोलीस कर्मचारी विशाल शिर्के यांना बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, एक इसम चोरीची मारुती कंपनीची स्विफ्ट चारचाकी गाडी नंबर एम.एच.१२/डी.वाय./४२४५ ही वापरत आहे अशी बातमी मिळाल्याने त्यास पथकाचे कर्मचा-यांसह सापळा रचून पकडले असता त्याने आपले नाव सलमान रुस्तम शेख, वय-१९, धंदा-ड्रायव्हर, रा. कुदळवाडी, बालगरे वस्ती, कुदळवाडी पोलीस चौकी मागे, चिखली, पुणे असे सांगितले. त्याचे ताब्यात मिळालेली मारुती कंपनीची स्विफ्ट चारचाकी गाडी नंबर एम.एच.१२/डी.वाय./४२४५ हिच्या बाबत चौकशी करता त्याने सांगितले की, सदरची मारुती कंपनीची स्विफ्ट कार ही माहे एप्रिल २०१८ मध्ये पिंपळेगुरव, पुणे येथून चोरुन आणली असल्याचे सांगितले. सांगवी पोलीस स्टेशन, पुणे येथे माहिती घेता, सदर मारुती स्विफ्ट कार चोरी गेले बाबत सांगवी पोलीस स्टेशन, पुणे येथे गु.र.नं.१९६/२०१८, भा.द.वि.क.३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असले बाबत माहिती प्राप्त झाली आहे. नमूद इसमास ताब्यात घेऊन त्याचेकडून वरील गुन्हयातील किं.रु.१,५०,०००/- ची मारुती कंपनीची स्विफ्ट चारचाकी गाडी जप्त करणेत आलेली आहे.

वरील कारवाई ही श्री. भानुप्रताप बर्गे सो, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-२, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली वाहनचोरी विरोधी पथकाकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, दिपक लगड, कर्मचारी जितेंद्र तुपे, सुनिल पवार, तुकाराम नाळे, सुहास कदम, विशाल शिर्के, शंकर संपते, हनुमंत बोराटे, सागर घोरपडे, मोहन येलपले यांनी सहभाग घेतला आहे.